मोटार अपघात प्रकरण ३३८/२०२३

चॉदबी वि. विलास व इतर

निशाणी क्रमांक – १६

**<u>साक्षीदाराची पुढील सरतपासणी अर्जदारातर्फे त्यांचे विधीज्ञ श्री.के.एस.किटेकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

१. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र् न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. त्यातील मजकूर मी स्वतः वाचून पाहिलेला आहे. यादी निशाणी क्र.१८ सोबत मी अपघाताच्या गुन्हयाचे दोषारोपपत्राची सत्यप्रत दाखल केली आहे. ती निशाणी क्रमांक १९ वर आहे. मृतकाचा वाहन चालवण्याचा मूळ परवाना मी दाव्यामध्ये दाखल केला आहे. तो निशाणी क्र.२० वर आहे. यादी निशाणी क्र.४ सोबत मी अपघाताच्या गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती निशाणी क्र.२१ वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.२२ वर आहे. मरणोत्तर पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.२३ वर आहे. शवविच्छेदन अहवालाची सत्यप्रत निशाणी क्र.२४ वर आहे. अपघात करणा–या वाहनाचे आर.टी.ओ. नोंदणी प्रमाणपत्र निशाणी क्र.२५ वर आहे. अपघात करणा–या वाहनाचे विमा पॉलीसी निशाणी क्र.२६ वर आहे. अपघात करणा–या वाहनाचे पी.यु.सी.सर्टीफिकेटची सत्यप्रत निशाणी क्र.२७ वर आहे. सामनेवाला क्र.१ च्या वाहन चालवण्याच्या परवान्याची प्रत निशाणी क्र.२८ वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.१ तर्फे श्री.टी.आर.उपाडे विधीज्ञ यांच्यामार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी स्वतः पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात कोणत्या वाहनाने केला याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझ्या पतीच्या चुकीमुळे झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये कारचालकाची कोणतीही चूक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रामध्ये खोटा मजकूर नमूद केला आहे.

**<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.२ तर्फे श्री.एस.जी.दिवाण विधीज्ञ यांच्यातर्फे</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, अपघातामध्ये माझ्या पतीला डोक्यावर मार लागला होता आणि त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या वेळी माझे पती मोटारसायकलने जात होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या वेळी माझे पती हेल्मेट घालून नव्हते. मला याबाबत माहीत नाही की, पोलीसांनी जेव्हा घटनास्थळ पंचनामा केला त्यावेळी त्यांना जागेवर हेल्मेट आढळून आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताला माझे पती आणि कारचालक हे दोघेही समान जबाबदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या वेळी माझ्या पतीचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रामध्ये चुकीचे नमूद केले आहे की, माझे पती ट्रॅक्टर चालक म्हणून काम करत होते आणि त्यांना महिन्याला पंधरा हजार रुपये उत्पन्न

मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये मी चुकीची माहिती दिलेली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
(आर.बी.भागवत)

दिनांक :– २०/०४/२०२६

जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा सदस्य
मोटार अपघात प्राधिकरण,लातूर